आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२६ जुलै २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कारगिल विजय दिनानिमित्त देशाची वीर शहीदांना आदरांजली

- पर्यावरण रक्षणासाठी प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून आवाहन

- केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा पदभार प्रल्हाद जोशी यांनी स्वीकारला

- पावसामुळे थांबलेली अमरनाथ यात्रा सुरु

**आणि**

- झिम्बाब्वे विरुद्ध भारताचा तिसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज हरारेमधे रंगणार

**<><><><><>**

कारगिल युद्धात हुतात्मा झालेल्या वीर जवानांना देश आज कारगिल विजय दिनानिमित्त आदरांजली वाहत आहे. कारगिल विजय दिनाचा मुख्य कार्यक्रम द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर झाला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी द्रास इथं युद्ध स्मारकावर शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल तसंच लष्करप्रमुख आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. संरक्षण मंत्र्यांनी यावेळी कारगिल युद्धस्मारकाच्या पोर्टलचं उद्घाटन केलं, तसंच शहीदपत्नींना सन्मानित केलं. शौर्यविजययात्रा या मोटारसायकल रॅलीला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><><>**

कारगिल विजय दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मातृभूमीसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर सैनिकांना आदरांजली अर्पण केली आहे.

सैनिकांची वीरगाथा देशवासियांना समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देत राहील, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. आजचा दिवस देशाचं लष्करी सामर्थ्य, राष्ट्रीय एकता आणि मातृभूमीच्या रक्षणासाठीचा अतूट निर्धार याची साक्ष देत असल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कारगिल विजय दिनानिमित्त सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीचा निर्धार अधिक दृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात कार्यक्रमातून देशवासियांना केलं. हा या कार्यक्रमाचा एकशे छत्तीसावा भाग होता. कारगिलच्या आव्हानात्मक परिस्थितीपेक्षा आपल्या सैनिकांचा ताठ कणा, दुर्दम्य साहस आणि अढळ आत्मविश्वास मोठा ठरला असं म्हणत त्यांनी हुतात्म्यांना आणि वीर सैनिकांना वंदन केलं.

**होल्ड बाईट - MKB KARGIL 1**

त्यांच्या शौर्यगाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं शौर्य विजय यात्रेचं आयोजन केल्याची माहिती त्यांनी दिली. एक यात्रा, एक राष्ट्र, एक सलाम हा संदेश देण्यासाठी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारकापासून निघालेली ही यात्रा कारगिलच्या युद्ध स्मारकापर्यंत जाणार आहे.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं केलेल्या क्षेपणास्त्र चाचण्यांचा, तसंच अलिकडेच नौदलाच्या ताफ्यात दाखल झालेल्या स्वदेश निर्मित महेंद्रगिरी या युद्धनौकेचा उल्लेख करुन आत्मनिर्भर भारताच्या वाढत्या ताकादीचं प्रतीक असल्याचं सांगून ते म्हणाले, भारताची संरक्षण उपकरणं आणि तंत्रज्ञानावर जगाचा विश्वास वाढत आहे.

कॅच द रेन मोहिमेच्या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचं सांगून, त्याअनुषंगानं देशभर सुरु असलेल्या यशदायी प्रयत्नांची तसंच त्यामुळे घडून आलेल्या बदलांची उदाहरणं त्यांनी सांगितली. महाराष्ट्रात नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण्याची क्षमता निर्माण करण्यात आल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

पर्यावरण संवर्धनाच्या मुद्यावर बोलताना प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी देशातल्या मातीपासून बनवलेल्या मूर्तींंची पूजा करावी या आपल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे, अशा मूर्तींची प्रतिष्ठापना ही निसर्गपूजाच ठरेल असं ते म्हणाले.

एक पेड माँ के नाम या उपक्रमाच्या सफलतेची उदाहरणंही त्यांनी दिली. एकदाच वापरून फेकून द्याव्या लागणाऱ्या प्लॅस्टीकमुळे होणारं प्रदुषण टाळणासाठी, देशभर सुरु असलेले प्रयत्न, त्यातून तयार होणारी उत्पादनं, आणि रोजगार याविषयीची माहिती त्यांनी दिली. रिड्यूस, रियूज आणि रीसायकल ही आज घोषणा नाही तर आपल्या जीवनाचा भाग बनली असल्याचं ते म्हणाले.

क्रीडा क्षेत्रात देशानं केलेल्या यशस्वी कामगिरीचा त्यांनी गौरव केला.

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतपद पटकावणारी पहिली भारतीय बँडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू, तसंच लॉर्ड्सवर झालेल्या पहिल्या महिला कसोटी क्रिकेट सामन्यात विजय मिळवणाऱ्या भारतीय संघाच्या कामगिरीचं कौतुक त्यांनी केलं.

ब्रिटनमध्ये ग्लासगो इथं सुरु असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करावी, आपल्या क्रीडाभावनेनं सर्वांची मन जिंकावीत यासाठी शुभेच्छा दिल्या.

अलिकडेच भौतिकशास्त्र , रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयांच्या ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी केलेल्या गौरवास्पद कामगिरीचा अभिमानपूर्वक उल्लेख त्यांनी केला. देशात ऑलिम्पियाड्स आणि हॅकेथॉनची संस्कृती विस्तारत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

येत्या ७ ऑगस्टला राष्ट्रीय हातमाग दिन साजरा होणार असून त्यानिमित्त त्यांनी श्रोत्यांना सांगितलं, की. सरकारी प्रोत्साहनामुळे असंख्य कारागीर आणि विणकरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला आहे.

गेल्या १२ वर्षांत खादीची विक्री सहा पट वाढली असून विक्रीचा आकडा आठ हजार कोटी रुपयांवर पोहोचला असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या सणासुदीच्या हंगामात खादी, हातमागाची उत्पादनं खरेदी करावीत, व्होकल फॉर लोकल नुसार स्थानिक उत्पादनांचा आग्रह धरावा, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाच्या निमीत्तानं 'हर घर तिरंगा या मोहीमेला उत्साहानं पुढे न्यावं, आपल्या घरी पूर्ण आदरानं तिरंगा फडकवावा असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार आज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी स्वीकारला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर काल केंद्रीय ग्राहक व्यवहार आणि नागरीपुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

**<><><><><>**

दिल्लीत शांततापूर्ण मार्गानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाणी प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करणारं पत्र लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लिहिलं आहे. आंदोलक विद्यार्थ्यांवर पॅलेट गनसारख्या शस्त्रांचा वापर करण्याला गृहमंत्री या नात्यानं मंजुरी दिली होती का, असा प्रश्नही राहुल गांधी यांनी या विचारला आहे.

दिल्लीत तैनात सुरक्षा दलं केंद्रीय गृहमंत्रालयाला उत्तरदायी आहेत, त्यामुळे या कारवाईला परवानगी कोणी दिली, विद्यार्थ्यांना मारहाण करणारे साध्या वेषातले लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक, त्यांच्या तैनातीला कोणी मंजुरी दिली, असे प्रश्नही त्यांनी विचारले आहेत.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते आज मुंबईत आयकर सिंधू या नवीन संकुलाचं उदघाटन झालं. करदात्यांनी दिलेल्या करांच्या साहाय्यानं देशाचं कोषागार या संकुलाच्या नावाप्रमाणे महासागराचं रूप घेत आहे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

मुसळधार पावसामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर कोसळलेली दरड हटवण्याचं काम पूर्ण झाल्यावर, आज पहाटे अमरनाथ यात्रेकरूंची १९ वी तुकडी जम्मू इथून बालताल बेस कॅम्प कडे रवाना झाली.

यंदा अमरनाथ यात्रेत आतापर्यंत ४ लाखापेक्षा जास्त भाविकांनी अमरनाथ गुंफांना भेट दिली आहे.

<><><><><>

सिक्कीममधल्या ‘नथु-ला’ मार्गे कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेली पाचवी तुकडी आज गंगटोक इथं सुरक्षित परतली. सिक्कीम पर्यटन विकास महामंडळानं काल गंगटोक इथं आयोजित केलेल्या स्वागत समारंभात यात्रेकरूंनी त्यांचे अनुभव सांगितले. यंदा नथु-ला मार्गे कैलास मानसरोवर यात्रेसाठी १० तुकड्या जाणार आहेत.

<><><><><>

आसामातल्या पूरस्थितीविषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याशी दूरध्वनीवरुन सविस्तर चर्चा केली. सोनोवाल सध्या दिब्रूगढमधे पूरग्रस्त

भागाच्या दौऱ्यावर आहेत. केंद्रसरकार पूरग्रस्तांच्या पाठीशी  आहे, त्यांना हरतऱ्हेने मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. केंद्राचं आंतरमंत्रालयीन पथक राज्यात दाखल झालं असून, बाधित प्रदेशाची पाहणी करत आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

अमेरिकन सैन्याने सुमारे दोन आठवड्यांनंतर इराणवरचे हवाई हल्ले थांबवले असून, संघर्ष थांबवण्यासाठी राजकीय प्रयत्नांना चालना दिली आहे. अमेरिकेनं काल रात्रभर कोणतीही मोठी लष्करी कारवाई केली नसल्याचं इराणनंही म्हटलं आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियातला तणाव निवळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मात्र, होर्मूझच्या समुद्रधुनीतली परिस्थिती अद्याप गंभीर असून, इराणच्या शेजारी, आखाती देशांमध्ये सुरक्षेबाबत असुरक्षितता कायम आहे.

<><><><><>

झिम्बाब्वे बरोबरच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला भारताचा तिसरा आणि शेवटचा सामना आज हरारे इथं होणार आहे.संध्याकाळी साडेचार वाजता खेळ सुरू होईल. काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं झिम्बाब्वेचा ९० धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारतीय टी-20 संघाचा नवीन कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील हा पहिलाच मालिका विजय आहे.

<><><><><>

मणिपूरच्या उखरूल जिल्ह्यात सुरक्षा दलांनी गेल्या चोवीस तासांत राबवलेल्या शोध मोहिमांमध्ये  शस्त्रसाठा तसंच अमली पदार्थ जप्त करण्यात आले, तसंच काही सशस्त्र दहशतवाद्यांना अटक करण्यात आली. दहशतवादी संघटनेसाठी नवीन भरती करण्याचं काम ते करत असल्याचा संशय आहे.

//<><><><><>//